श्रीक्षेत्र आदासा, ता.कळमेश्वर, जि.नागपूर
<u>येथील उपाहारगृहाच्या बांधकामाकरिता</u>
निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.१७/का.१४४४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ डिसेंबर, २०१५.

<u>वाचा :-</u>

१.शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१०/प्र.क्र.१०७/का.१४४४, दि.२७ डिसेंबर, २०११.
२.शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१२/प्र.क्र.६२/का.१४४४, दि. १६ फेब्रुवारी, २०१३.
३.जिल्हा नियोजन अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.जिनिस/कार्या-३७/कपा.सुच./का.४ २२४४/२०१५ दि. २९ डिसेंबर, २०१५.

<u>प्रस्तावना :-</u>

श्रीक्षेत्र आदासा, ता.कळमेश्वर, जि.नागपूर येथील उपाहारगृहाच्या बांधकामाकरिता शासन निर्णय दिनांक २७ डिसेंबर, २०११ अन्वये, मान्यता देण्यात आलेल्या ₹ ११२.२३ लक्षच्या कामांसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी जिल्हाधिकारी, नागपूर यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्रीक्षेत्र आदासा, ता.कळमेश्वर, जि.नागपूर येथील उपाहारगृहाच्या बांधकामाकरिता जिल्हाधिकारी, नागपूर यांना ₹ ५०.५६ लक्ष निधी वितरित करण्यात येत आहे.

२. सदरहू खर्च लेखाशिर्ष "मागणी क्रमांक ओ-१०, ५४५२- पर्यटनावरील भांडवली नियतव्यय, ०१, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१-पर्यटन केंद्रे, (००) (०१) श्रीक्षेत्र आदासा, ता.कळमेश्वर, जि.नागपूर येथे उपहारगृहाचे बांधकाम, ५३- मोठी बांधकामे (५४५२ ००६२) योजनांतर्गत योजना (दत्तमत) " याखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. वर नमूद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेल्या खर्चाचा ताळमेळ घालण्यात यावा. वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अंदाज-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११६०६२३१९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yatin Arvind Pimpley

Digitally signed by Yatin Arvind Pimpley
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Yatin Arvind Pimpley
Date: 2015.12.31 16:07:25 +05'30'

(य.अ.पिंपळे)
अवर सचिव.

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३) वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई.
४) जिल्हाधिकारी, नागपूर.
५) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर.
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, नागपूर.
७) जिल्हा नियोजन अधिकारी, नागपूर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
९) अध्यक्ष, श्रीक्षेत्र आदासा, ता.कळमेश्वर, जि. नागपूर.
१०) नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती, का.१४४४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
